नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९

कलम १०(३) व १०(५) खालील नोंदीबाबत...

## महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः नाजक २०१८/प्र.क्र. ५१/नाजकधा-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९

**संदर्भ :-**

1) शासन निर्णय क्रमांकः नाजक २०१४/ प्र.क्र. ९५/ नाजकधा-३, दि.०९.०६.२०१६
2) शासन पत्र क्रमांक - नाजक २०१४/ प्र.क्र. ९५/ नाजकधा-३, दि.११.०६.२०१८
3) द्विसदस्यीय समितीचा दि.९.८.२०१८ रोजीचा अहवाल

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ हा नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ अन्वये निरसित केला असून, उक्त निरसन अधिनियम राज्य शासनाने दि.२९.११.२००७ रोजी स्विकारला आहे. निरसन अधिनियमान्वये विविध प्रयोजनासाठीचे कलम २० खालील सुटीचे आदेश (Exemption orders), त्याखालील कार्यवाही आणि कलम १०(३) व १०(५) अन्वये संपादित केलेल्या जमिनींवरील कार्यवाही संरक्षित आहे.

२. यासंदर्भात नाजकधा कलम २० अन्वये गृहबांधणीकरीता सूट देण्यात आलेल्या जमिनींबाबत जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून नजर चुकीने सूटीखालील जमिनीबाबत नाजकधा कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही करण्यात येऊन अशा जमिनींच्या अधिकार अभिलेखामध्ये शासनाच्या नावाच्या नोंदी घेण्यात आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. नाजकधा अधिनियमातील तरतुदीनुसार अतिरिक्त घोषित जमीनींवर केवळ कलम २० खाली सूट देण्याची अथवा कलम १०(३) व १०(५) अन्वये संपादनाची कार्यवाही अपेक्षित असल्याने एकाच जमीनीवरील दोन्ही कलमांन्वये केलेली कार्यवाही चुकीची ठरते.

याकरिता संदर्भीय क्र.१ मधील शासन निर्णय दि.०९.०६.२०१६ नुसार गृहबांधणी प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनीवर नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार करण्यात आलेली कार्यवाही रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच दि.१०.४.२०१८ रोजी आयोजीत मंत्रीमंडळ

उपसमितीमध्ये नाजकधा कलम २० अन्वये भूखंड विकास, औद्योगिक, शेती व इतर प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या क्षेत्रावर कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही झाली असल्यास अशी कार्यवाही रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. दरम्यानच्या कालावधीमध्ये नाजकधा कलम २० च्या रखडलेल्या योजना पुर्ण करण्यासाठी आणि सुटीच्या आदेशाखालील जमिनी विकसनासाठी उपलब्ध होण्याकरीता उपाययोजना सुचविण्यासाठी श्री.बी.एन.श्रीकृष्ण, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.सर्वोच्च न्यायालय व श्री.बी.एन.मखिजा, सेवानिवृत्त सचिव, महाराष्ट्र शासन यांची द्विसदस्यीय समिती दि.१६.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली. सदर व्दिसदस्यीय समितीने उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दि.०९.०६.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गृहबांधणी योजनेबाबत लागू करण्यात आलेल्या तरतुदी औद्योगिक, कृषी व इतर प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या जमिनींनाही लागू करण्याची शिफारस केली आहे. सदर द्विसदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी दि.१८.११.२०१८ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत स्विकारण्यात आल्या आहेत. तसेच व्दिसदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी, मंत्रीमंडळाने दिलेली मान्यता व मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र.५५८/२०१७ मध्ये दि.०२.०७.२०१९ रोजी दिलेले निदेश विचारात घेऊन एकाच जमीनीवर नाजकधा कलम २० आणि कलम १०(३) व १०(५) अंतर्गत कार्यवाही करण्यात आलेल्या प्रकरणांबाबत एकत्रितपणे निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय दि.९.६.२०१६ अधिक्रमीत करण्यात येत असून गृहबांधणी योजनेबाबत लागू करण्यात आलेल्या तरतुदी औद्योगिक, कृषी व इतर प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या जमिनींबाबत एकत्रितपणे खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन ) निरसन अधिनियम, १९९९ नुसार कलम २० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या गृहबांधणी, औद्योगिक, कृषी व इतर प्रयोजनार्थ योजनांना संरक्षण प्राप्त आहे. अंमलात असलेल्या नाजकधा कलम २० खाली मंजूर योजनेखालील क्षेत्रावर नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार कार्यवाही करुन अशा क्षेत्रावर महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद करण्यात आली असेल तर, अशा प्रकरणी केलेली संपादनाची कार्यवाही अयोग्य ठरत असल्याने, सदर क्षेत्रावर नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार केलेली कार्यवाही व त्याबाबतच्या नोंदी रद्द करण्यात येत असून अशा जमीनींच्या अधिकार अभिलेखात घेण्यात आलेली "महाराष्ट्र शासनाची" नोंद कमी करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येईल. मात्र अशा जमीनींच्या अधिकार अभिलेखात "नाजकधा कलम २० अन्वये सूटीखालील क्षेत्र" अशी नोंद घेण्यात येईल, तसेच नाजकधा

कलम २० खालील सुटीच्या आदेशाच्या नोंदी व त्याबाबतच्या अटी / शर्ती जमिनमालक / योजनाधारक यांच्यावर बंधनकारक राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६११४१५२७७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samadhan Vasantrao Khatkale

Digitally signed by Samadhan Vasantrao Khatkale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3cc48a0aa3fbc01f7ee956a75c9445a5b81fec5e429c69234939d35b4eaceee0, cn=Samadhan Vasantrao Khatkale
Date: 2019.09.16 12:57:25 +05'30'

**(समाधान खटकाळे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा.प्रधान सचिव /सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
९) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर.
१०) जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, नागपूर, सांगली, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर.
११) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, पुणे, नागपूर, सांगली-मिरज-कुपवाड, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर.
१२) सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती (नाजकधा-१,२,३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.